वर्ष- १० अंक- १२ मुंबई, मंगळवार, ६ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०२४ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 सर्व अनधिकृत बांधकामे पाडा, उच्च न्यायालयाचे कल्याण-

3 आली घटिका समीप

अनेक गंभीर आजारांपासून बचाव करू शकतात तुळशीची पाने, 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

'मराठा आणि ओबीसी समाजांत भेदभाव...', भुजबळांचा फडणवीसांना इशारा; म्हणाले, 'तुमचा गृहविभाग...'

■मुंबई। प्रतिनिधी,

मराठा समाजाने आरक्षणासाठी काढलेल्या मोचार्नंतर राज्य सरकारने मराठा आंदोलकांच्या अनेक मागण्या मान्य करत अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार कुणबी नोंदी सापडलेल्या मराठा समाजातील लोकांना कुणबी जातप्रमाणपत्र दिलं जाणार आहे. तसेच कुणबी प्रमाणपत्र असणाऱ्या व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही हे प्रमाणपत्र दिलं जाईल, अशी घोषणा राज्य सरकारने केली आहे. याविरोधात राज्यभरातले ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. अशातच ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी अहमदनगर येथे ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात बोलताना छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात दंड थोपटले. छगन भुजबळ यांनी यावेळी ओबीसींवरील अन्यायाच्या काही कथित बातम्या वाचून दाखवल्या. भुजबळ म्हणाले, 'श्रीगोंद्यात ओबीसी एल्गार सभेची पूर्वतयारी सुरू असताना तिथे पोलीस पाठवण्यात आले आणि काम थांबवण्यात आलं. पोलिसांकरवी ओबीसी समाजात दहशत निर्माण केली जात आहे. त्यांना नोटीसा दिल्या. नोटीस देण्याच्या नावाखाली लोकांच्या सह्या घेतल्या. हे सगळं नेमकं काय चाललंय?' भुजबळ यांनी यावेळी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाब विचारला. भुजबळ म्हणाले, देवेंद्र फडणवीस साहेब, हे सगळं काय चाललंय. तुमच्या गृह विभागाला सांगा, तुमच्या गृह विभागाकडून असा भेदभाव होता कामा नये. जे काही नियमाने असेल ते सगळ्यांनी करावं. आम्हाला एक न्याय आणि त्यांना रात्री ३ वाजता सभेची परवानगी कशी मिळते? छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजातील लोकांची सभा रात्री दोन वाजता होते, त्यांना परवानगी कशी काय दिली जाते. त्यांच्यावर कारवाई का होत नाही.

थोडा उशीर पण निवड योग्य, अडवाणींचे अभिनंदन करताना शरद पवारांनी व्यक्त केली खंत

■मुंबई। प्रतिनिधी,

भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणींना देशातील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. त्यानंतर देशभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांनी देखील अभिनंदन केले आहे. भारतरत्न जाहीर झालेली दोन्ही नावं अतिशय योग्य असून थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे, असे म्हणत शरद पवारांनी भारतीय जनता पक्षाला (भाजप) टोमणा मारला आहे. ते पुण्यात माध्यमांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी विविध विषयांवर आपले मत व्यक्त केले आहे.

शरद पवार म्हणाले, भारतरत्न जाहीर झालेली कपुर्री ठाकूर आणि लालकृष्ण आडवाणी दोन्ही नावं अतिशय योग्य आहेत. अडवाणी देशाच्या संसदेत अनेक वर्ष होते. भाजपचे नेते, संसदेचे सदस्य, मंत्री म्हणून आदर्श काम करत आहेत. थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे. बिहारचे माजी मुख्यमंत्री कपुर्री ठाकूर आणि लालकृष्णी अडवाणी संसदेत अनेक वर्षे होते. त्यांचा पराभव कधी झाला नाही, रथयात्रा काढली तेव्हा एकदा मतभेद झाले.थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे. त्यांना सन्मान मिळाला आहे,आता समाधान व्यक्त करतो. त्यांच्या पक्षात काय घडलं याच्या खोलात जात नाही.उल्हासनगर गोळीबार प्रकरणी बोलताना शरद पवार म्हणाले, सत्तेचा गैरवापर केला जात आहे. कायदा हाती घेणाऱ्यांना मोकळीक दिली जात आहे. सरकारची बघ्याची भूमिका असेल तर राज्य कोणत्या दिशेला जातंय याचा विचार केला पाहिजे. कायदा हातात घेणाऱ्या विरोधात गैरवापर होत आहे. राज्य सरकारची सगळ्या बाबतीत बघ्याची भूमीका घेते असे वाटते. अशा गोष्टी महाराष्ट्र नागरिकांच्या दृष्टीने चिंताजनक आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटप चर्चा चांगली झाली, जागा जिंकणे महत्वाचे असले तरी कशासाठी हे महत्वाचे असतात. जागावाटपाचा 9 ते 10 फेब्रुवारीपर्यंत तिढा सुटेल.

निवडणुका होऊ द्यात नंतर एकत्रित बसू अशी भूमिका ममता बॅनर्जी यांनी घेतली. नितीशकुमार यांची भूमिका अशी का बदलली सांगू शकत नाही. इंडिया आघाडी बैठकीमध्ये नितीशकुमार यांनी आक्रमक भूमिका भाजप विरोधी घेतली होती. सत्तेचा गैरवापर होतो त्याला पर्याय राहिलेला नाही,शेवटी सामान्य जनतेसमोर जावं लागेल. सोरेन आदिवासी नेता आहेत.

स्वप्नातल्या पालकमंत्र्यांनी जॅकेट शिवलं, जुनं झालं; नवे नॅपकिन घेतले, घामाने भिजले; ठाकरे गोगावलेंवर बरसले

■रायगड। प्रतिनिधी,

आज मंत्री होणार, उद्या मंत्री होणार, परवा मंत्री होणार, स्वप्नातले पालकमंत्री... नवीन जॅकेट शिवलं, ते जॅकेट घातलं, ते जुनं झालं, नवनवीन नॅपकिन घेतले, तेही घामाने भिजले, पण मंत्रीपद काही मिळतच नाही, अशा शब्दात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाडचे आमदार भरत गोगवले यांचा समाचार घेतला आहे. या रायगडमध्ये शूरवीर जन्माला आले, निष्ठावंत जन्माला आले, त्याच रायगड जिल्ह्यामध्ये रायगड किल्ल्यावरती गद्दारांना दाखवलं जाणारं टकमक टोक आहे, म्हणून या जिल्ह्याचे नाव आहे, असा इशारा ठाकरेंनी गद्दारांचे नाव घेत विरोधकांना दिला आहे. हा जनसंवाद नाहीत तर मी माज्या कुटुंबाच्या जवळ हा संवाद साधतोय. हे सगळं माझं कुटुंब आहे. करोना कालावधीत माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम मी या सगळ्या आपल्या कुटुंबासाठी राबवली होती. काही जणांना यावरूनसुद्धा पोटदुखी आहे. तुम्ही सगळे मला महाराष्ट्रातील जनता आपल्या कुटुंबातील सदस्य मानता तर काही जणांना दारोदारी जाऊन सुद्धा सगळे म्हणतात 'हड' अशी विरोधकांची खिल्ली उडवत, 'सरकार आपल्या दारी, लोक सांगतात जा तुज्या घरी' अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील सभेत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. रायगडचं वारं असं फिरलं नाही तर रायगडाच्या वाऱ्याने मोठमोठे सरकारला झोपवले आहे. दिल्लीला, आग्यार्ला झुकवणारा हा रायगड आहे, असा शब्दात रायगडचं कौतुक करत ही भूमी नरवीर तानाजी मालुसरेंची आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आम्ही भगवा फडकवणारच पण या भूमीत आता झेंडा राहिला बाजूला आणि नॅपकिन फडकवणारेच खूप झाले, अशा शब्दात महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांच्यावर त्यांनी निशाणा साधला आहे.

सिनिअर सिटीझन सोशल राईट फाऊंडेशन व पीएस फाऊंडेशन यांच्यावतीने ज्येष्ठांचा सत्कार

अंधेरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक नरेंद्र डबाळे उपस्थित

■मुंबई। प्रतिनिधी,

सिनिअर सिटीझन सोशल राईट फाऊंडेशन व पी एस फाऊंडेशन यांच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांचा वाढ दिवस कार्यक्रम व सत्कार समारंभ रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी साईनगर गार्डन येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपिठावर अंधेरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक नरेंद्र डबाळेसाहेब , सचिन उतेकर, मील स्पेशल संदिप राठोड, अध्यक्षा तुकाबाई चौधर, सल्लागार अनंत दाभोळकर, निवृत्त पोलीस अधिकारी पंढरीनाथ खंडागळे, कार्यक्रमाचे सयोजक संतोष चौधर उपस्थित होते. यावेळी पोलीस निरिक्षक नरेंद्र डबाळेसाहेब भाषण करताना म्हणाले की, ज्येष्ठांचे अनेक प्रश्न असतात. एकटे राहातात त्यांना लुटण्याची शक्यता असते. औषधांची, पोषणाची समस्या असतात. घरात त्रास असतो. जीवाला धोका असतो. अशा ज्येष्ठांना पोलीस ठाण्यातुन सरंक्षण व मार्गदर्शन दिले जाईल.असे सांगुन अंधेरी पोलीस ठाण्यातुन निश्चितपणे सहकार्य केले जाईल. यावेळी अनंत दाभोळकर, पंढरीनाथ खंडागळे, संतोष चौधर यांची समयसुचक भाषणे झाली. यावेळी बचत गटातील महिला उपस्थित होत्या.महिला व पुरूष ज्येष्ठांची उपस्थिती १५० च्यावर समाधानकारक होती. २० ज्येष्ठांचा वाढ दिवस साजरा करण्यात आला. सर्वांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

नैसर्गिक वायूचा आता कोकणापर्यंत विस्तार, महानगर गॅसचा युनिसन कंपनी खरेदी करार पूर्ण

■मुंबई। प्रतिनिधी,

सध्या महामुंबईत प्रदेशात होणारा नैसर्गिक वायूच्या पुरवठ्याचा विस्तार आता कोकणात होणार आहे. यासाठी केंद्र सरकारी महानगर गॅस लिमिटेडने युनिसन एन्वायरो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा १०० टक्के हिस्सा खरेदी केला आहे. हा करार गेल्या वर्षीच झाला होता.

आता अलिकडेच केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंडळाने या खरेदीला हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे ही खरेदी आता प्रत्यक्षात आली आहे.

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) ही केंद्र सरकारी गॅस ऑथोरिटी ऑफ इंडियाची (गेल) उपकंपनी आहे. ह्याएमजीएलह्लकडून महामुंबईतील (मुंबई शहर, उपनगर, मीरा-भाईंदर महापालिका, वसई-विरार महापालिका, पालघर, ठाणे व रायगड जिल्हा) २० लाखांहून अधिक घरांमध्ये पाइपने स्वयंपाकासाठी नैसर्गिक वायू (पीएनजी) पुरवला जातो. त्याखेरीज मुंबईतील सर्व ऑटोरिक्षा, टॅक्सी, कॅब व अनेक बसगाड्या या सीएनजीवर चालतात. त्यांचा आकडाही ५ लाखांच्या वर आहे. या सर्वांना महानगर गॅसकडून दररोज सुमारे ३५० कोटी लिटर नैसर्गिक वायूचा पुरवठा होतो. याखेरीज आता कंपनी रत्नागिरीत विस्तारासाठी सज्ज झाली आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, युनिसन एन्वायरो ही मुंबईत मुख्यालय असलेल्या अशोका बिल्डकॉन व मॉर्गन स्टॅनले इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर, या दोन कंपन्यांची संयुक्त कंपनी आहे. या कंपनीचे रत्नागिरी, लातूर, धाराशिवसह कर्नाटकमधील दोन जिल्ह्यात सध्या जुजबी स्वरुपाचे गॅस वितरण जाळे आहे. आता महानगर गॅसने ही कंपनी खरेदी केल्यानंतर या जाळ्याचा विस्तार होणार आहे.

महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट च्या कार्यकारणीत सर्वात मोठा बदल

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट या पत्रकारांच्या सर्वात मोठ्या संघटनेमध्ये एक तरुण तडफदार नेतृत्व असलेले तसेच कित्येक वर्ष देशोन्नती, पुण्यनगरी, पुढारी, सामना, मराठवाडा साथी, अशा अनेक वृत्तपत्रांमध्ये गेल्या पंचवीस वषार्पासून काम केलेल्या व सध्या दैनिक महाराष्ट्र प्रतिमा चे परभणी जिल्हा आवृत्तीचे संपादक म्हणून कार्यरत असणारे संजय कुलकर्णी (सुपेकर) यांची महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट च्या मराठवाडा विभाग अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. वर्तमानपत्रात लिखाण केल्यामुळे अनेक वेळा त्यांच्यावर प्राणघातक हल्ले देखील झालेले असून त्यांना महाराष्ट्र शासनाने काही महिने संरक्षण देखील दिले होते. ते परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी आहेत. मराठवाड्यातील सर्व साप्ताहिक व दैनिक वृत्तपत्राचे संपादक, प्रतिनिधी, छायाचित्रकार व मुक्त पत्रकार तसेच महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांना पत्रकारिता क्षेत्रात न्याय मिळावा म्हणून महत्त्वाची भूमिका घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्टचे मुख्य कार्यालय भाईंदर पूर्व जिल्हा ठाणे येथे त्यांची नियुक्ती करण्यात आली त्या सदर प्रसंगी महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नलिस्टचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक नाईक, राष्ट्रीय सचिव विनोद मेढे, सरचिटणीस सुधाकर दळवी, जगदिश नाईक व पोलीस बातमी पत्राचे पत्रकार कासिम सय्यद आणि त्यांचे कॅमेरामॅन (छायाचित्रकार) सुभाषचंद्र यादव इत्यादी सर्वजण उपस्थित होते.

डोंबिवलीत रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यावर हल्ल्याचा प्रयत्न; चाकू, दगडाचा वापर

■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवली पश्चिमेतील उमेशनगर मध्ये बुधवारी रात्री एका रिक्षा चालकाने रिक्षा चालक मालक संघटनेचे पदाधिकारी शेखर जोशी यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून संतप्त रिक्षा चालकाने हा प्रकार केला आहे. या हल्ल्याचा प्रयत्न करत असताना रिक्षा चालकाने रिक्षेतील चाकू बाहेर काढून रिक्षा संघटना पदाधिकारी जोशी यांना धमकावण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी जोशी यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. एमएच-०५-डीझेड-९३३३ असा रिक्षेचा वाहन क्रमांक आहे.

रिक्षा संघटना पदाधिकारी शेखर जोशी बुधवारी रात्री उमेशनगर मधील तोंडवळकर विद्यालया समोरील चहाच्या टपरीवर चहा पित उभे होते. त्यांची दुचाकी टपरीच्या समोर उभी होती. चहा पिऊन झाल्यानंतर तक्रारदार जोशी जाण्यास निघाले. त्यावेळी त्यांच्या दुचाकीच्या समोर एक रिक्षा उभी होती. जोशी यांनी संबंधित रिक्षा चालकाला दुचाकी काढेपर्यंत रिक्षा थोडी बाजुला घे, अशी विनंती केली. त्या मागणीकडे दुर्लक्ष करत रिक्षा चालक तेथून निघून गेला. दुचाकी काढायची कशी असा प्रश्न निर्माण झाल्याने जोशी यांनी त्यांना पुन्हा रिक्षा काढण्याची विनंती केली. त्यावेळी रिक्षा चालकाने अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जोशी यांना रस्ता तुमच्या बापाचा आहे का. रिक्षा जागेवरून काढणार नाही, असे बोलून जोशी यांच्याशी वाद घातला. शाब्दिक चकमकीनंतर रिक्षा चालकाने रिक्षेत जाऊन पाठीमागे लपून ठेवलेला धारदार चाकू कमरेला लावला आणि दुसऱ्या हातात वजनदार दगड घेऊन तो जोशी यांच्या डोक्यात टाकण्याचा, तसेच चाकूची धमकी देऊन त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. टपरी जवळील काही नागरिक मध्ये पडल्याने मोठा अनर्थ टळला.

ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या नागपूरात बदल्या

■ठाणे। प्रतिनिधी,

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गृह विभागाने पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यास सुरूवात केली आहे. त्यानुसार ठाणे पोलीस दलातील १७ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या थेट जिल्ह्याबाहेर बदल्या करण्यात आल्या आहेत. यातील सर्वाधिक अधिकाऱ्यांच्या बदल्या या नागपूर शहर पोलीस दलात करण्यात आल्या आहेत. बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदारसंघ असलेल्या कोपरी-पाचपाखाडी मतदार संघातील वागळे इस्टेट, श्रीनगर आणि कोपरी या पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा सामावेश आहे.

विशेष म्हणजे, बदल्या झालेले काही पोलीस अधिकारी ठाणे शहरातील मोक्याच्या पोलीस ठाण्यात बदलीच्या प्रयत्नात होते अशी चर्चा पोलीस दलात सुरू आहे. येत्या काही दिवसांत आणखी काही पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुका येत्या काही दिवसांत लागू शकतात. शहरात अनेक वर्ष काम करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा थेट तेथील पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी किंवा लोकप्रतिनिधींसोबत परिचय असतो.

नवी मुंबईत दोन दिवस रोटरी क्लबची परिषद; राज्याच्या शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, बदलापूर-अंबरनाथ, उल्हासनगर, भिवंडी-शहापूर आदी भागांतील रोटरी क्लबची वार्षिक परिषद ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी नवी मुंबईतील वाशी एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून पुढील दोन दिवस विविध क्षेत्रांतील मान्यवर या परिषदेत विचार मांडणार आहेत.

माजी खासदार डॉ. विनय सहस्त्राबुध्दे, अध्यात्मिक गुरू डॉ. स्वरुपानंद सरस्वती, राम मंदिर निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणारे टाटाचे प्रकल्प प्रमुख निलेश ताम्हाणे, परमवीरचक्र विजेते आणि कारगिल युध्दात लक्षणीय कामगिरी बजावणारे कॅ. योगेंद्र यादव, मेट्रो वुमन अश्विनी भिडे, आदित्य मोहिमेतील प्रमुख शास्त्रज्ञ निगर शाजी, वंदे भारतचे सुधांशू मणी, क्रिकेटपटू करसन घावरी, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. जगन्नाथ दीक्षित, डॉ. उदय निरगुडकर, अतिरिक्त पोलीस महासंचालक विश्वास नांगरे-पाटील, जेनेरिक औषधांचा प्रचार करणारे अर्जुन देशपांडे, अंबा युध्दनौकेवरील पहिल्या महिला कमांडर इंदू प्रभा, जम्मू-काश्मिरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक आनंद जैन, अभिनेते मुनी झा, वास्तूशास्त्र तज्ज्ञ डॉ. रविराज अहिरराव, पर्यावरणतज्ज्ञ संतोष गोंधळेकर, आर्थिक सुरक्षातज्ज्ञ डॉ. अपूर्वा जोशी, डॉ. राधाकृष्ण पिल्ले, निवृत्त एअर चीफ मार्शल बिरेंद्रसिंग धनुआ आदी मान्यवर या परिषदेत विचार मांडणार आहेत, अशी माहिती रोटरी-३१४२चे प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी यांनी दिली.

नालासोपाऱ्यात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या मालवाहतूक वाहनांना भीषण आग

■वसई। प्रतिनिधी,

नालासोपारा पूर्वेच्या धानिव बाग परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या मालवाहतूक वाहनांना भीषण आग लागल्याची घटना घडली आहे.

बुधवारी रात्री पावणे एकच्या सुमारास ही घटना घडली. या आगीत पाच ते सहा मालवाहतूक वाहने जळून खाक झाली आहेत. नालासोपारा पूर्वेच्या भागात धानिव बाग परिसर आहे. या परिसरात मालवाहतूक वाहने ही पार्किंग करण्यात आली होती. परंतु रात्रीच्या सुमारास या वाहनांमध्ये अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला होता.

आगीची तीव्रता अधिक असल्याने यात पाच ते सहा वाहनांनी पेट घेतला होता. या घटनेची माहिती मिळताच वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. एक ते दीड तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.

या घडलेल्या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून आगीत पाच ते सहा मालवाहतूक वाहने जळून खाक झाली आहेत असे अग्निशमन दलाच्या जवानांनी सांगितले आहे. रात्रीच्या सुमारास ही घटना घडल्याने आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली होती.

खाडीपूल दुरुस्ती रखडल्याने उरणकर त्रस्त

■उरण। प्रतिनिधी,

सिडकोने उरण - पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या दुरुतीचे काम सुरू केले आहे. मात्र हे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण होणार असल्याचे आश्वासन दिले होते. मात्र पुलाच्या दुरुस्तीचे काम धिम्यागतीने सुरू असल्याने ३१ जानेवारीची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे येथील बोकडवीरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चार गावांतील हजारो नागरिकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

उरण-पनवेल मुख्य मार्गावरील हा खाडीपूल कमकुवत असल्याने या मार्गावरील एसटी व एनएमएमटी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे. खाडीपूल त्वरित दुरुस्त करावा या मागणीसाठी ऑक्टोबरमध्ये जनवादी महिला संघटनेने सिडको कार्यालयावर आंदोलन केले होते. त्यावेळी सिडकोचे अधीक्षक अभियंता श्रीकांत गोसावी यांनी जानेवारी २०२४ पर्यंत पुलाची दुरुस्ती करून प्रवासी वाहनांसाठी खुला करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कामाला सुरुवात झाली आहे. मात्र काम पूर्ण होण्यास विलंब लागत आहे. कारण पुलाचा मुख्य भाग अजून तसाच आहे. मागील तीन वर्षांपासून खाडीपूल प्रवासी वाहनांसाठी बंद असल्याने येथील नागरिक, विद्यार्थी यांना अधिक वेळ आणि खर्चाचा प्रवास करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून लांबलेला राज्य महामार्ग क्रमांक १०३ हा उरण चारफाटा, बोकडवीरा ते करळ फाटा असा साडेसहा किलोमीटरचा मार्ग १ सप्टेंबरला सार्वजनिक बांधकाम विभागाने सिडकोकडे हस्तांतरित केला आहे. त्यामुळे मार्गावरील सिडको द्रोणागिरी कार्यालया समोरील खाडीपूल कधी दुरुस्त करणार असा सवाल नागरिकांकडून केला जात होता.

या मार्गावरील हाईटगेटमुळे झालेल्या अपघातात अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

२०२१ सालापासून सिडकोच्या द्रोणागिरी नोड कार्यालय व फुंडे स्थानकालगतच्या नादुरुस्त खाडी पुलामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील जड व प्रवासी वाहो रोखण्यासाठी उरण-पनवेल मार्गावर हाईटगेट बसविले आहेत. बोकडविरा व फुंडे महाविद्यालयाजवळील दोन्ही बाजूच्या हाईटगेटमुळे अधिक उंचीच्या वाहनचालकांना उंचीचा अंदाज न आल्याने वाहनांचे अपघात होऊ लागले आहेत.

सर्व अनधिकृत बांधकामे पाडा, उच्च न्यायालयाचे कल्याण-डोंबिवली महापालिकेला आदेश

दोन आठवड्यांत अहवाल देण्याचे आदेश

मुख्य न्यायाधीशांनीही एका जनहित याचिकेत केडीएमसीच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे पाडण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशाचे समर्थन करत आम्हीही पालिकेला त्यांच्या हद्दीतील सर्व बेकायदेशीर बांधकामे तोडण्याचे आदेश देत आहोत. प्लॉट, बाउंड्रीजची तमा न बाळगता काळण असो वा गांगुर्डे जिथे अनधिकृत बांधकामे दिसतील त्यावर हातोडा घाला, असे आदेश न्यायालयाने पालिकेला दिले. तसेच न्यायालयाने पालिकेला दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

■मुंबई। प्रतिनिधी,

प्लॉटची, त्यांच्या चतुःसीमांची तमा न बाळगता मग ते काळण असो वा गांगुर्डे जिथे अनधिकृत बांधकामे आढळतील त्यांच्यावर हातोडा मारा, असे कठोर आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कल्याण-डोंबिवली महापालिकेला बुधवारी दिले. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पोलिस सुरक्षा देत नाहीत, असा तक्रारीचा सूर कल्याण- डोंबिवली महापालिकेने न्यायालयात आळविला. त्यावर न्यायालयाने पोलिसांना दट्टया दिला. कोणताही पोलिस अधिकारी न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करण्याइतपत व्यस्त असू शकत नाही.

आमच्या आदेशाचे पालन करण्यास पोलिसांनी सतत नकार दिला तर, आम्ही त्यांच्यावर अवमानाची कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी तंबी न्या. गौतम पटेल व न्या. कमल खटा यांच्या खंडपीठाने पोलिसांना दिली.

केडीएमसीच्या हद्दीत राहणाऱ्या विमल गांगुर्डे व तुलसीराम काळण यांच्यात प्लॉटच्या मालकीवरून निर्माण झालेला वाद उच्च न्यायालयात पोहोचला. काळण यांनी संबंधित प्लॉटवर बेकायदा बांधकाम केल्याचे न्यायालयात मान्य केले. त्यानंतर न्यायालयाने केडीएमसीला संबंधित बांधकाम पाडण्याचे आदेश दिले. बुधवारच्या सुनावणीत खंडपीठाने कारवाईबाबत बांधकामावरील केडीएमसीकडे विचारणा केली. पोलिस संरक्षणाअभावी आपण बांधकामावर कारवाई केली नाही, अशी माहिती पालिकेने खंडपीठाला दिली. त्यामुळे न्यायालयाने पोलिसांना फैलावर घेत आवश्यक तेवढे पोलिस बळ पालिकेला उपलब्ध करण्याचे आदेश दिले.

'ज्या अनधिकृत बांधकामांवर पालिका कारवाई करणार आहे, त्यासाठी पोलिस बळ उपलब्ध करा. आम्ही एक पाऊल पुढे जाऊन सांगतो की, पोलिस केवळ यादीतील अनधिकृत बांधकामांवर नाही तर सर्वच अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास पालिकेला साहाय्य करतील. अर्थात, पालिका केवळ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करेल. ही अनधिकृत बांधकामे कोणाची आहेत, कुठे बांधण्यात आली आहेत, याच्याशी आमचा काही संबंध नाही. फक्त, बांधकामे अनधिकृत आहेत का? हेच पाहावे, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

वाडा उपविभागात ३२ लाखांची वीजचोरी करणाऱ्या ७९ जणांविरुद्ध कारवाई

■मुंबई। प्रतिनिधी,

डोंबिवलीः महावितरणच्या वाडा उपविभागात ७९ वीज चोरांविरुद्ध जानेवारी महिन्यात कारवाई करण्यात आली आहे. या वीज चोरट्यांनी ३२ लाख ५८ हजार रुपये किंमतीची १ लाख ५० हजार ४९४ युनिट विजेची चोरी केल्याचे उघड झाले आहे.

मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीजचोरी शोध मोहिम नियमितपणे सुरू आहे. त्यांतर्गत वाडा उपविभागातील वाडा, अशोकवन, मैंदे, आमगाव, गायकरपाडा, डोंगस्ते, बिलावली, तुसा, काटी, देवघर, जामधर, उंबरखांड, पाच्छापूर, नेवाळे, खांबाळे, महाप, शिरोळे, बासे, वापे, खरीवली, दिघाशी, जांबिवली, चिंचघर, बिलोशी आदी परिसरात व्यापक वीजचोरी शोध मोहिम राबवण्यात आली. या शोध मोहिमेत ७९ जणांकडून सुरू असलेली ३२ लाख ५८ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आली. वीजचोरीचे देयक आणि तडजोडीची रक्कम भरण्याच्या नोटिसा संबंधितांना बजावण्यात आल्या असून विहित मुदतीत या रकमांचा

भरणा टाळणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल होण्यासाठी पोलिसांत फिर्याद देण्यात येणार आहे.

खारघरमधून साडेपाच लाखाचे एमडी जप्त, नायजेरियन व्यक्तीवर गुन्हा दाखल

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

गुन्हे शाखा पोलिसांनी खारघर येथून ५२ ग्रॅम एमडी जप्त केली आहे. याप्रकरणी एका नायझेरियन व्यक्तीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर परिसरात एकजण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्याद्वारे अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांच्या पथकाने बुधवारी त्याठिकाणी सापळा रचला होता. यामध्ये एका संशयित नायझेरियन व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची झडती घेण्यात आली. त्यामध्ये त्याच्याकडे ५२ ग्रॅम एमडी हा ड्रग्स आढळून आला.

बाजारभावानुसार त्याची किंमत ५ लाख २० हजार रुपये आहे. अधिक चौकशीत त्याचे नाव गिडिओन इझे (२५) असून तो तळोजाचा

राहणारा असल्याचे समोर आले. तो एमडी ड्रग्स घेऊन खारघर परिसरात विक्रीसाठी आला होता. तत्पूर्वीच अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच्यावर कारवाई केली. याप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अमली पदार्थ विरोधी पथक अधिक तपास करत आहे.

महिला अत्याचार घटनांचे सत्र सुरूच, वर्षभरात महिला अत्याचारांचे २७३९ गुन्हे

लैंगिक अत्याचारांच्या ७७२ घटना

■ठाणे। प्रतिनिधी,

जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मागील वर्षभराच्या कालावधीत २ हजार ७३६ महिलांवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये ५५२ महिलांवर बलात्कार आणि १८३ महिलांवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. याचबरोबर हुंडाबळी, अपहरण, मारहाण, अनैतिक व्यापार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची संख्या देखील लक्षणीय आहे. ठाणे जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी जाहीर करण्यात येणाऱ्या सांख्यिकी अहवालातून ठाणे शहर, ग्रामीण आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात झालेल्या या गुन्ह्यांची माहिती समोर आली आहे. ठाणे जिल्ह्यात गुन्हेगारी वाढू नये याची काळजी पोलिस यंत्रणेकडून घेतली जात असली तरी जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात मागील वर्षभराच्या कालावधीत महिलांवर झालेल्या अत्याचाराची संख्या अधिक आहे. महिला सुरक्षेसाठी स्थानिक पोलीस प्रशासन तसेच जिल्हा महिला बालविकास विभागातर्फे विविध उपयोजना राबविण्यात येत असतात. याच बरोबर महिलांच्या विरोधात होणाऱ्या अत्याचार विरूध्द महिलांनी पुढे येऊन तक्रार करावी यासाठी देखील जनजागृती करण्याचे काम मोठ्या प्रमाणत करण्यात येत असते.

मागील वर्षभराच्या कालावधीत ठाणे शहर, ठाणे ग्रामीण आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महिला अत्याचाराचे तब्बल २ हजार ७३६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये बलात्कार सारख्या गंभीर गुन्ह्याची ५५२ प्रकरणे आहेत तर १८३ महिलांवर लैंगिक अत्याचार सारख्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यात दिवसाला दोन महिलांवर लैंगिक अत्याचाराची घटना घडत असल्याचे या आकडेवारीतून समोर आले आहे. याचबरोबर महिलांची फसवणूक करून त्यांना अनैतिक देह व्यापार करण्यास प्रवृत्त करण्याच्या प्रकरणांची देखील संख्या चिंताजनक आहे.

महिलांवर झालेल्या अत्याचार गुन्ह्यांची नोंद (२०२३)

बलात्कार - ५५२
अपहरण - ६९०
हुंडाबळी - ६
लैंगिक अत्याचार - १८३
अनैतिक व्यापार - ३७
मारहाण आणि इतर हिंसाचार झ १ हजार २६८

गुन्ह्यांचा 'डिजिटल' छडा

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई पोलीस कामकाजात डिजिटलायझेशनवर भर आहे. हे डिजिटलायझेशन केवळ अंतर्गत कामकाजात नव्हे तर तपास कामातही सुरू केले आहे. आता समन्ससुद्धा पाठवण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर केला जात आहे. आय बाईक, ह्यथथार्थ प्रणालीसारखी तपास पद्धत राज्यात पहिल्यांदाच वापरली जात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. एम. पोलीस पद्धती अर्थात मिशन कन्व्हिक्शन याखाली सर्व पद्धतींचा वापर केला जात आहे. वर्षभरात एकूण गुन्ह्यांच्या ७३ टक्के गुन्हे उकल करण्यात यश आले आहे. तर दोष सिद्धीत २०२२च्या तुलनेत २०२३ मध्ये ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. इ पेरावी पद्धतीमध्ये समन्स पाठवण्यासाठी ई-मेल वा समाजमाध्यमाचा वापर केला जातो. २०२३ मध्ये या पद्धतीने ७ हजार ३९७ ई-समन्सद्वारे १९ हजार २४४ साक्षीदारांना समन्स पाठवण्यात आले. यापैकी १४ हजार १०५ साक्षीदार न्यायालयात हजर झाले होते. आय बाईक ही पद्धत सुरू केली. या पद्धतीनुसार गुन्ह्याच्या ठिकाणी पुरावे गोळा करण्यासाठी दुचाकीवर गेलेले प्रशिक्षण घेतलेले एक पथक केवळ पुरावे गोळा करतात. यातील पुराव्याची तपासणी लॅबमध्ये केली जाते. अशा पद्धतीने २०२३ या वर्षात ३ हजार ८८६ गुन्ह्यामध्ये १ हजार ३८ आणि अपमृत्यू मध्ये १ हजार ३८ प्रकरणात १७३ ठिकाणी आय बाईकचा वापर करण्यात आला.

मिरा- भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्र. : 819 2828.

जा.क्र. मनपा/मध्यवर्ती भांडार /304/2023-24 दि. 31/01/2024

// Tender Notice //

Government / Semi Government Institutions. Local Self Government Institutions are inviting online tenders from contractors with relevant experience for the following works. Blank tender form of this tender dated. 01/02/2024 to dt. On 09/02/2024at 3.00 pm. The e-tendering of the Corporation will be available on the Government of Maharashtra's website http://mahatenders.gov.in till 3.00 pm. The hint amount, form fee will be accepted online through the online receipt system available on the e-tendering website. It should be noted. The tender for this work was called in two envelopes. On 12/02/2024 at 3.00 pm. These will be accepted online on the website till 3.00 pm. The tender was issued on. Will open on 13/02/2024. (Tender sanctioned amount Rs. 90.00 lakhs).

Sr.No.	Particulars	Form Fees + GST Tax 18%	EMD Deposit
1	Printing of various boards-banners, hoardings, nameplates and boards for Mira Bhayander Municipal Corporation.	Rs. 17000 + Rs. 3060 = Rs. 20,060/-	Rs. 1,70,000/-

Ref. No. MBMC/PRO/E1384237/2023-24

Date : 02/02/2024

सही/-
(सुनिल यादव)
सहा. आयुक्त (मध्यवर्ती भांडार विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

संपादकीय... झुंज छोट्या वाघरांची...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

मार्जारकुळातील मोठे सभासद वगळता सुमारे अकरा प्रकारचे प्राणी आपल्याकडे आढळतात. ती सर्वच छोटी, एकांडी, अत्यंत लाजाळू अशी विविध प्रकारची वाघरे आहेत. विलक्षण सुंदर, रुबाबदार अशा ही वाघरे नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. त्यांचे संवर्धन गरजेचे आहे.

वाघ, चित्ते, बिबळे व सिंह हे मार्जारकुळातील मोठे सभासद वगळूनही, भारतीय उपखंडामध्ये मार्जारकूळ छोट्या व मध्यम आकाराच्या सभासदांच्या भरपूर वैविध्याने नटलेले आहे. असे सुमारे अकरा प्रकारचे प्राणी आपल्याकडे आढळतात. ही सर्वच-छोटी वाघरे, एकांड्या शिकारी करणारी, अत्यंत लाजाळू रीतीने आपल्या सवयींनुसार कालक्रमणा करणारी असल्यामुळे त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे खूप अवघड असतेच, पण त्यांचे दर्शनदेखील दैवदुर्लभ असते. मात्र हे सर्वच सभासद विलक्षण सुंदर आणि रुबाबदार असतात. मुख्य म्हणजे, त्यांच्या अधिवासातील अन्नसाखळीच्या ती शिरोभागी असल्याने, ती धड राहिली तरच तिथल्या सृष्टीव्यवस्था तग धरून राहतात. पैकी काहींची आता अस्तित्वासाठीच झुंज सुरू झाल्याचे दिसते. त्यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण महामंडळासारखी स्वायत्त यंत्रणा आता सर्वाधिक गरजेची आहे. सर्वाधिक संकटात आहे ते यातले 'कॅराकल' -मराठी नाव 'कलंदर'. कमी उंचीच्या टेकाडांवर अथवा वाळवंटी प्रदेशात जगण्यासाठी जुळवण झालेले वाघरू. राजस्थान, कच्छ, पंजाबच्या उत्तरेकडील भाग हे त्याचे अधिवास. सडपातळ, सुमारे सोळा किलो वजन. अंगावर तांबडी किरमिजी फर. ही वाघरे अविश्वसनीय रीतीने चपळ असतात. इतकी, की वाळवंटी ससे पळू लागताक्षणीच त्यांना कलंदरने पकडलेले असते. किंवा बचावासाठी पकुड्यांनी (सँडग्राऊझ) हवेत उड्डाण करताच ते उडी मारून त्यांना पकडू शकतात. आजमितीला भारतभरात जेमतेम पन्नास इतकीच या प्राण्यांची संख्या असावी. एखादी जात टिकायची असेल तर कमीत कमी एक हजार इतकी संख्या आवश्यक असते. आशियाई चित्त्यानंतर नामशेष होण्याची पुरेपूर शक्यता कलंदरची वर्तवली गेली आहे.

मध्य भारतात आणि पंजाबमध्ये तर अधिवास असूनही त्यांना गेली पन्नास वर्षे कुणीच पाहिलेले नाही. त्यांची संख्या कमी होण्याची मुख्य कारणे म्हणजे चोरटी शिकार आणि अवैध व्यापार हीच होती. पण गेल्या काही वर्षात तसे काहीच प्रकार घडलेले नसूनही अधिवास नष्ट होत गेल्याने त्यांच्यावर ही वेळ आली आहे. जंगलापेक्षा माळरानावर ते जास्त आढळत असल्याने, अशा जमिनींमध्ये कॅमेरा ट्रॅप लावून पाहणी करायला हवी, ते झालेले नाही.

झाडवाघरू/ढगाळ बिबट्या (Clouded leopard), सोनवाघरू (Golden cat) आणि झाडमांजर (Marbled cat) ही ईशान्येकडील राज्यांमध्ये आढळणारी गोंडस, सुंदर वाघरे. त्यांच्यापैकी झाडवाघरांची वृक्षांवर चढण्याची, वावरण्याची क्षमता इतर सर्वांपेक्षा जास्त असते. त्यांचे सुळेही वाघरांमध्ये सर्वात मोठे असतात. २०२१च्या 'आययूसीएन' अहवालात त्यांची जगभरात संख्या तीन हजार ७०० ते पाच हजार ५८० इतकीच उरली होती. ईशान्येकडील सदाहरित, घनदाट पर्जन्यवनांमध्येच सोनवाघरुही (गोल्डन कॅट) सापडते. त्यांचे शरीर ठिपकेविरहित, सोनसळी लाल रंगाचे असते. गालावर मात्र गडद आणि फिके अशा दोन्ही प्रकारचे पट्टे असतात. सामान्यतः कलंदरपेक्षा ते चणीने थोराड असतात आणि त्यांची शेपटीही अधिक लांब असते. पिसोरी इ. छोटी हरणे आणि हरणांची लहान पिले हा त्यांचा सर्वसाधरण आहार असतो. जरी ते सहजी झाडांवर चढू शकत असले, तरी त्यांचा अधिक सहज वावर हा जमिनीवर कोसळलेल्या मोठ्या खडकांदरम्यान नोंदला गेला आहे. झाडमांजर (Marbled cat) ही याच भागांमधली वाघरांची आणखी एक छोट्या चणीची, भित्री जमात. झुपकेदार लांब शेपूट आणि त्यावर तपकिरी मळकट रंगात असणारी सुरेख नक्षी, तीही काळ्या आणि गडद करड्या रंगांची हे या जातीचे वैशिष्ट्य.

ही जात संपूर्णपणे वृक्षनिवासी (arboreal) आहे. विश्रांती घेणारे पक्षी, खारी आणि अगदी कीटकदेखील झाडमांजरांचे भक्ष्य असतात. मोठे प्राणी मारण्यातील धोके वाढले, तशी तस्करांची नजर या सर्व वाघरांवर गेली. त्यांना मारून त्यांची मऊशार फर, कवट्या, हाडे, पंजे दात सर्वच अवयव वाघाचे म्हणून खपवले जात असतात. सांप्रत काळी मिझोराम राज्यातील चांफाई जिल्हा हा या वाघरांच्या सीमापार तस्करीचा हॉटस्पॉट गणला जातो.

संघर्षाची धग अन् उपेक्षेची सल

पश्चिम हिंसाचाराच्या ताज्या घटनांमुळे लक्ष वेधून घेणारे मणिपूर आणखी एका घटनेमुळे नुकतेच चर्चेत आले होते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या भारत जोडो न्याय यात्रेची सुरुवात करण्यासाठी मणिपूरचीच निवड केली. त्यामुळे बऱ्याच महिन्यांनी मणिपूरच्या जनतेने हिंसाचार, बंद, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त याशिवाय वेगळे, राजकीय वातावरण अनुभवले. माणिपूरमध्ये गेल्या वर्षीच्या मे महिन्यापासून, म्हणजे नऊ महिन्यांपासून संघर्ष सुरू आहे. संघषार्ची केंद्रे निवडक असली तरी परिणाम व्यापक आहेत. त्यामुळे हा संघर्ष तातडीने आणि नागरिकांना विश्वासात घेऊनच सोडवणे आवश्यक आहे. देशात लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही मणिपूरमधल्या परिस्थितीकडे पाहायला हवे. मणिपूरमध्ये काँग्रेस आणि भाजप या दोन्ही राजकीय पक्षांचे चांगलेच अस्तित्व आहे. सध्याचे सरकार भाजपचे असून ही त्यांची दुसरी टर्म आहे. त्याआधी सलग तीन वेळा आणि त्याहीआधी बऱ्याच वेळा काँग्रेसचे सरकार होते. पण तरीही, राष्ट्रीय राजकारणात मणिपूरला महत्त्व मिळालेले नाही.

कदाचित या राज्याकडे पाहिले की या दोन्ही पक्षांना - राज्यसभेची एक जागा आणि लोकसभेच्या दोन, एवढेच दिसत असावे. दिल्लीकडून आलेली कोणत्याही प्रकारची राजकीय लाट ईशान्येतल्या दऱ्याखोऱ्यांत विरून जाते. प्रचंड हिंसाचार होऊनही पंतप्रधानांचे या प्रश्नावरचे मौन आणि यात्रेसाठी जाणीवपूर्वक मणिपूरची निवड करूनही राहुल गांधी यांना मूळ प्रश्नांपेक्षा 'मोदी इकडे आलेच नाहीत' या एकाच मुद्द्यावर भर द्यावासा वाटणे, यातूनच या दोन्ही पक्षांची मणिपूरच्या संघषार्बाबतची चिंता दिसून येते. दोन राष्ट्रीय पक्ष असूनही या राज्याचे प्रश्न सुटत नसतील, तर हे या दोन्ही पक्षांचे अपयश आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ५१ टक्के असलेल्या मैतेई आणि ४० टक्के लोकसंख्या कुकी या आदिवासी समुदायात नऊ महिन्यांपासून वाद चिघळलेला आहे. बहुसंख्य आणि राजकारणात वर्चस्व असलेल्या मैतेई समुदायाला 'आदिवासी' हा दर्जा देण्याच्या आणि त्या माध्यमातून आरक्षणाचे लाभ देण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाला विरोध म्हणून सुरू झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागून आत्तापर्यंत झालेल्या संघर्षात १८० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. सातत्याने संचारबंदी, बंद, इंटरनेट बंद असल्यामुळं छोट्या मोठ्या व्यावसायिकांचा अक्षरशः बाजार उठला आहे. जे फळविक्रते महिन्याकाठी ४०-४५ हजारांचा व्यवसाय करत होते, त्यांच्या हातात कसेबसे ४-५ हजार पडत आहेत. महागाईत साडेअकरा टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. बहुतांश मणिपूर शांतच आहे, असे सरकार सांगत असले तरी वातावरणाचा पर्यटकांच्या संख्येवरही परिणाम झाला आहेच. जी-२० च्या बैठका झाल्यानं पर्यटकसंख्येत वाढ होण्याची आशा निर्माण झाली असतानाच संघर्ष निर्माण झाला आणि आधीच्या वर्षी असलेली एक लाख साठ हजार ही पर्यटकसंख्या थेट वीस हजारांवरच आली आहे. राज्यातल्या हिंसाचारात शेकडो घरे, दुकाने आणि प्रार्थनास्थळे जाळली गेल्यामुळे हजारो जण

आली घटिका समीप

अंतरिम अर्थसंकल्प सादर करतानाचे भाषण म्हणजे लक्ष्यित समूह डोळ्यासमोर ठेवून केलेली लोकसभा निवडणुकीची तयारीच म्हटली पाहिजे. अनेक प्रकारचे सोहळे साजरे करण्याची भारतीयांची आवड सर्वज्ञात आहे. त्या आवडीला कार्यक्रम व्यवस्थापनाचा अर्थात इव्हेंट मॅनेजमेंटचा अद्ययावत स्पर्श दिला गेला की, या सोहळ्यांचे महत्त्व कमालीचे वाढते. ते ओळखण्यात मोदी सरकार किती माहीर आहे, हे आजवर अनेक उदाहरणांतून दिसले आहे. या सोहळागर्दीत अर्थसंकल्प सादरीकरणासारख्या गंभीर विषयाचाही समावेश होताना दिसतो.

अर्थसंकल्पाच्या पूर्वतयारीपासून ते प्रतिक्रियांपर्यंतचा साग्रसंगीत उपचार, या सगळ्याभोवती मीडियाने धरलेला फेर, थेट प्रक्षेपण, चर्चा या सगळ्याचा गेल्या काही वर्षांत जणू पॅटर्नबनला आहे. विशेष म्हणजे लेखानुदानाचे सादरीकरणही त्याळा अपवाद ठरलेले नाही. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी संसदेत वित्तविधेयक सादर करण्याच्या निमित्ताने केलेले भाषण म्हणजे लक्ष्यित समूह (टार्गेट ऑडियन्स) डोळ्यासमोर ठेवून केलेली लोकसभा निवडणुकीची तयारीच म्हटली पाहिजे. निवडणुकीची घटिका समीप आल्याचे नाद-निनाद त्यांच्या भाषणातून जाणवले.

जुलैमध्ये आम्ही पूर्ण अर्थसंकल्प सादर करू, हे त्यांचे विधान आणि २०१४ पूर्वीच्या अर्थसंकल्प व्यवस्थापनातील गोंधळाची श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा यातील राजकारण कोणालाही कळेल. निवडणूक जवळ आलेली असताना महत्त्वाच्या घोषणा आणि धोरणात्मक निवेदने केली जाऊ नयेत, असा संकेत आहे. तो सरकारने बव्हंशी पाळला आणि सवलतींच्या खैरातीचा मोह टाळला, हे मान्य करायला हवे.

मात्र भाषणाचा एकूण आशय मोदी सरकारच्या गेल्या पाचच नव्हे, तर दहा वर्षांतील कामगिरीचे महत्त्व ठसविण्याचा होता. ते करताना उद्धृत केलेल्या बऱ्याचशा संख्यांचा उल्लेख यापूवीर्ही वेगवेगळ्या निमित्ताने झाला आहे. परंतु आकड्यांच्या आकर्षक महिरपीतही वास्तव लपत नाही. उदाहरणार्थ, गेल्या दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरीबीच्या खाईतून बाहेर काढण्यात यश आले, असे अर्थमंत्र्यांनी नमूद केले. ही अर्थातच समाधानाची बाब. परंतु या घटकाच्या सक्षमीकरणाचे नेमके स्वरूप काय आहे, याच्या तपशीलात त्या शिरत नाहीत. यापैकी बहुतेक जण कोविडकाळातील ठाणबंदीच्या परिणामी पुन्हा गरीबीत ढकलले गेले होते. त्यातून ते सावरले असले तरी त्यांचे ठोस, कायमस्वरूपी सक्षमीकरण हा खरा मुद्दा आहे. ह्यमुद्राह्ल योजनेंतर्गत वाटप झालेल्या कर्जांचा आकडा सांगितला गेला; परंतु कर्जवसुलीच्या प्रमाणाविषयी मौन पाळले गेले. वित्तीय तूट जीडीपीच्या साडेचार टक्क्यांवर आणणे हे मूळ उद्दिष्ट २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात निर्मला सीतारामन यांनी नमूद केले होते. परंतु २०२४-२५ या आर्थिक वर्षात वित्तीय तुटीचे जीडीपीशी असलेले प्रमाण ५.१ टक्के राहणार असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्याच भाषणातील उल्लेखानुसार १४ लाख तेरा हजार कोटीची कर्जउचल अंदाजित आहे.

सरकारने दिलेला अंदाजित वित्तीय तुटीचा आकडा आहे सोळा लाख ८५ हजार कोटी. महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी असलेले ३९ टक्के प्रमाण लक्षात घेता उचलेल्या कजार्पैकी तेवढी रक्कम अनुत्पादक कामांसाठी वापरली जाणार हे स्पष्ट होते. वित्तीय शिस्तीबाबत काटेकोर आहोत, असा दावा अर्थमंत्री करतात, पण त्याच्याशी हे वास्तव मेळ खात नाही. अमृतकाल हा कर्तव्यकाल आहे, हे त्यांचे विधान मात्र वास्तवाला धरून आहे आणि ते लोकांनी लक्षात घ्यायला हवे. अनुदाने, सवलती यांचा वर्षाव करून सातत्याने मायबाप सरकारची संकल्पना अधिकाधिक घट्ट करीत जाणे हे राजकीयदृष्ट्या सोईचे असेल तरी अर्थव्यवस्थेला उपकारक ठरत नाही. त्यादृष्टीने संपत्तीनिर्मितीच्या वाटा शोधणे आणि त्यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे ठरते. सरकार त्याहीदृष्टीने विचार करीत आहे, याचा सुखद प्रत्यय या अंतरिक अर्थसंकल्पातील काही मुद्यांवरून नक्कीच येतो. विशेषतः पर्यटनात वाढ करण्यासाठी उचललेली पावले महत्त्वाची आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोदी सरकार सातत्याने वाढीव तरतूद करत आला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्पही त्याला अपवाद नाही. त्यातून रोजगारसंधी वाढतील, अशी अपेक्षा आहे. पण रोजगारनिर्मितीचे आव्हान इतके मोठे आहे आणि सर्वस्तरीय आहे, की एखाद-दुसऱ्या क्षेत्रात प्रयत्न करून त्याला तोंड देता येणार नाही. मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय यांना डोळ्यासमोर ठेवून काही योजनांचे सूतोवाच करण्यात आले आहे.

PUBLIC WORKS DEPARTMENT PWD MAHARASHTRA

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) पिन कोड -४००६०१

दुरध्वनी क्र. : (022) 2533 3144 (022) 2530 4514
वेबसाइट : www.mahapwd.com ई मेल : elthane.ee@mahapwd.gov.in
जा.क्र. काअ/ठाविवि/स्वि.स/निविदा/६३७/सन २०२४ दिनांक ०६.०२.२०२४

दरपत्रक सुचना क्र. 02 सन 2023-2024

संदर्भ : ०१ महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
०२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दिनांक १६ फेब्रुवारी २०२४
०३ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दिनांक ७ ऑगस्ट २०२३

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र.(022) 25333144 हे Providing Internal Electrification, External Electrification, Networking, HVAC, Sub Station, CCTV, F.F and F.A system, Lifts for Tahsildar New Administrative Building at Thane, State Maharashtra या प्रकल्पामधील कामाच्या विद्युतीकरणाच्या बाबींमधील दरसुची बाह्य दर प्राप्त होणेस्तव खालील बाबींचे सिलबंद लखोट्यात दरपत्रक मागवित आहेत. सिलबंद लखोट्यातील दरपत्रके दिनांक ०६/०२/२०२४ पासून दिनांक १३/०२/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत विभागिय कार्यालयात सादर करावीत. सादर करण्यात आलेली दरपत्रके दिनांक १३/०२/२०२४ रोजी दुपारी १५.०० वाजता उघडण्यात येतील.

तसेच दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बा. विभाग, सा.बा. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (022) 25333144 यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाही.

खालील बाबींच्या सविस्तर तांत्रिक विर्निदेशाकरीता elthane.ee@mahapwd.gov.in and elethane.ee@mahapwd.gov.in या ईमेल वर मागविण्याबाबत ई मेल पाठविण्यात यावा, जेणेकरुन खालील बाबींचे तांत्रिक विर्निदेश पाठविणे सोईचे होईल अथवा कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

NON CSR- Rate Inviting Notice

Providing Internal Electrification, External Electrification, Networking, HVAC, Sub Station, CCTV, F.F. and F.A system, Lifts for Tahsildar New Administrative Building at Thane, State Maharashtra

No.	Quantity	Item of work	Unit
1	1.000	Ventilation System for basement: Consist of Tube axial fans and smoke spill fans. Fans should withstand minimum static pressure of 10mm/wg with minimum aire chages of 4500 CFM. Outlet velocity not less than 9m/s. Efficiency of fans should be above 60%. Noise level should be @ 60dB. The details of various required models are as per attached list.	Job
2	1.000	11/0433 kv, 50Hz, 200KVA Indoor Type Cacuum cast coil dry type cast regine Transformer, copper wound.	Job
3	1.000	SITC of Electric traction passenger lift with collective, selective with on /off switch rated capacity 20 Passenger/1360 Kg (Gr + 20 floors)	Job
4	1.000	SITC of 20 passanger Fire evacuation lift for G+20 Floors Building.	Job

Note : Detaisl of Item Discription is available in the office of the Deputy Engineer (Electrical) Thane Electrical Sub Dn Thane amd Division Office Thane

(S.R.Pujari)
Executive Engineer (Electrical)
Thane Electricals Division
P.W.Deptt. Thane

अनेक गंभीर आजारांपासून बचाव करू शकतात तुळशीची पाने, फायदे वाचून व्हाल अवाक्!

आपल्या तुळशीतील औषधी गुणांमुळे तुळशीचा समावेश औषधी वनस्पतींमध्ये करण्यात येतो. तुळशीच्या सेवनाने शरीरात सकारात्मक उर्जा प्रवाहीत होते व मानसिक दृष्ट्या व्यक्ती प्रबळ होण्यास मदत होते. तुळशीच्या पानांचा, मुळांचा, फुलांचा, फांद्यांचा, मंजीरीचा आणि खोडाचा वापर औषधी म्हणून करता येतो. जाणून घेऊयात तुळशीच्या पानांच्या फायद्यांबद्दल...

ताप – ताप आल्यावर तुळशीच्या पानांचा रस प्यायल्यानंतर ताप कमी होतो. तसेच तुळशीच्या पानांचा काढाही ताप कमी करण्यास फायदेशीर ठरतो. लहान मुलांना ताप आल्यानंतर तुळशीच्या तेलाने मालिश केल्याने ताप कमी करण्यास मदत होते. तुळशीची पाने कच्ची खाल्याने देखील ताप कमी होण्यास मदत होते.

दातांचं आरोग्य – दातदुखी, कमजोर हिरड्या, दातांतून रक्त येणे, दात किडणे यासर्व गोष्टींसाठी औषध म्हणून तुळशीचा उपयोग केला जातो. दररोज 4 ते 5 तुळशीची पाने तोडांत ठेवल्यास चांगला फायदा होतो. आयुवेर्दामध्येही दातांचे आरोग्य राखण्यासाठी तुळस लाभदायी असल्याचे सांगितले आहे.

तोडांची दुगंर्धी – तुळशीच्या पानांचा उपयोग आपण मुखवास म्हणूनही करू शकतो. तोंडातून दुगंर्धी येणे, चव नसणे, तोंड कोरडे पडणे यांवर उपाय म्हणून तुळशीच्या पानांचं सेवन करू शकता. तुळशीच्या पानांमधील पोषक तत्व तोंडात लपलेल्या बॅक्टेरियांना नष्ट करण्यास प्रभावी ठरतात. त्यामुळे तुळशीच्या पानांचं सेवन केल्यावर श्वास घेतल्यास ताजंतवानं वाटतं.

त्वचेची काळजी – तुळशीमध्ये मोठ्या प्रमाणावर ॲंटी-ऑक्सिडेंट असतात. त्याचप्रमाणे यात व्हिटमिन ए आणि बी असतात भरपूर असतात. त्यामुळे त्वचेवरील इन्फेक्शने, त्वचेवरील खाज दूर करण्यासाठी तुळशीच्या पानांचा फार उपयोग होतो. तसेच तुळशीची पाने आंघोळीच्या पाण्यात टाकून आंघोळ केल्याने त्वचा टवटवीत होते. तुळशीच्या पानांचा उपयोग चेहऱ्यावरील काळे डाग दूर करण्यासाठीही होतो.

मधुमेहावर नियंत्रण – तुळशीमध्ये असलेलं इगेनॉल द्रव्य मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यासाठी उपयुक्त ठरतं. रोज सकाळी तुळशीची पाने खाल्ल्याने अथवा तुळशीच्या पानांचा रस प्यायल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळवण्यास मदत होते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढते – शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही तुळस गुणकारी मानली जाते. तुळशीमध्ये अनेक गुणकारी तत्वे आढळून येतात. ज्यांमुळे शरिरातील रोगप्रतिकारक शक्ती, प्लेटलेट्स वाढविण्यासाठी मदत होते. तसेच शरिरातील थकवा दूर करण्यासाठीही तुळस उपयुक्त ठरते.

मेटाबॉलिज्म – तुळशीची पानं आपल्या पोटासाठी खूप फायदेशीर असतात. यामुळे मेटाबॉलिज्म सिस्टीम दुरुस्त होण्यास मदत होते. या व्यतिरिक्त तुळशीची पानं गॅस एसिडीटीसारख्या डाएजेशन डिसॉर्डरपासूनही आराम मिळवून देतात.

बदामाचे तेल नियमित वापरा, चेहऱ्याचे आरोग्य वाढवा

हेल्दी स्कीनसाठी : बदामाच्या तेलाचे अगणित फायदे आहेत. चेहऱ्याचा रंग उजळण्यासाठी आणि ग्लोसाठी बदाम हे फारच उपयुक्त आहे. हे त्वचेला पोषण देते, त्यामुळे त्वचा जास्त मुलायम होते. हे मॉइश्चरला त्वचेमध्ये लॉक करते आणि पोर्सही ब्लॉक होऊ देत नाही.

त्वचा उजळण्यासाठी : बदाम रोगनमध्ये असलेल्या ॲंटिऑक्सिडंट्समुळे त्वचेला फारच उपयुक्त आहे. त्वचा काळवंडली असेल आणि त्वचेवर ग्लो आणायचा असेल तर रोज चेहऱ्यावर बदाम रोगन तेलने मालीश करा. यामुळे चेहऱ्यावरील ग्लो वाढेल.

डार्क सर्कल कमी करण्यासाठी : रात्री झोपण्याआधी डोळ्यांच्या खाली या तेलाने हलकी मालीश केल्यास खूप फायदा होतो. रोज या तेलाचा वापर केल्याने डार्क सर्कल्स निश्चितच कमी होतात.

ॲंटी- एजिंग : या तेलातील ॲंटी एजिंग इफेक्टचा फायदा सर्वात जास्त आहे. या तेलाचा वापर रोज केल्यास त्वचा फ्रेश आणि तारुण्यमय राहते. यात असलेल्या व्हिटॅमिन आणि फॅटी ॲसिड्समध्ये एजिंग रिव्हर्स करण्याची आणि स्कीन सेल्सला नावीन्य देण्यासाठी सहायक आहे.

टॅनिंग रिमूव्ह करण्यासाठी : बदाम तेलाचे फायदे अनेक आहेत पण सगळ्यात चांगला गुण असा की, हे तेल नॅचरल सनस्क्रीन म्हणूनही काम करतं. हे त्वचेला टॅनिंग आणि सनबर्नपासूनही वाचवतं. तसंच सूर्याच्या किरणांचा वाईट परिणामही दूर करतं.

डाग-विरहित त्वचेसाठी : बदाम तेलाचा वापर करण्याने तारुण्यपिटिकांची समस्या दूर होते आणि तुम्हाला मिळते डागविरहित त्वचा. हा एक वापरलेला आणि अनुभवलेला फॉर्म्युला आहे. हे त्वचेला खाजेपासूनही सुटका देतं आणि स्कीनला रिलॅक्स करतं.

कोरडेपणा दूर करण्यासाठी : जर त्वचा कोरडी, निर्जीव आणि खरखरीत झाली असेल तर बदाम रोगनने चेहऱ्यावर चांगला मसाज करा. हे स्कीनचे ड्रायनेस घालवते आणि त्वचेला मुलायम बनवते. खासकरून थंडीच्या दिवसांमध्ये बदाम रोगन त्वचेसाठी अगदी औषधांप्रमाणे काम करते.

मेकअप रिमूव्हर म्हणून वापरा बदाम रोगन तेल : चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी सर्वात चांगला पर्याय म्हणजे हे तेल, कारण हे फारच हलके आणि कमी चिकट असते. हे पोर्स चांगल्या रीतीने उघडते आणि मेकअपच्या सगळ्या खुणा दूर करते. बदाम तेल हे प्रत्येक प्रकारच्या त्वचेसाठी उपयुक्त आहे.

रक्तवाढीसह पित्तनाशक आहे, वातदोषही कमी करते सीताफळ

सीताफळ एक सीझनल फळ आहे. सध्या बाजारात सीताफळे मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. हंगामी काळात ते फळ खाल्ल्याने आरोग्यासाठी फायदेशीर असते. सीताफळ हे अतिशय उपयुक्त असे फळ आहे. सीताफळ खाण्यासाठी जितके स्वादिष्ट लागते तितकेच ते आरोग्यासाठी उत्तम असते. सीताफळ हे पित्तनाशक, पौष्टिक, रक्तवर्धक, वातदोष कमी करणारे फळ आहे. काही जणांना पिकलेल्या सीताफळाचा गर खायला आवडतो तर काही जणांना त्याच्यापासून तयार केलेले मिल्कशेक आणि बासुंदी, तर जाणून घ्या सीताफळ आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे.

हृदयरोगापासून बचाव – आजकालच्या दगदगीच्या जीवनशैलीमुळे हृदयावरील ताण दिवसेंदिवस वाढत चालला आहे. काम आणि चिंता यामुळे हृदयाचे आरोग्य बिघडण्याची शक्यता अधिक असते. हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी हृदयातील मांसपेशींना मॅग्नेशियमची गरज असते. सीताफळात भरपूर प्रमाणात मॅग्नेशियम असते. ज्यामुळे हृदयविकारापासून दूर राहण्यासाठी सीताफळ खाणे तुमच्यासाठी नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

अशक्तपणा कमी होतो – आजकाल योग्य पोषण न झाल्यामुळे आणि रक्ताचे प्रमाण कमी असल्यास ॲनिमियाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ज्यामुळे सतत थकवा आणि चक्कर अशी लक्षणे जाणवतात. पुरुषांपेक्षा महिलांना या समस्येचा त्रास अधिक होत असते. मात्र सीताफळात लोह भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे सीताफळ खाण्यामुळे शरीरातील लोहची कमतरता भरून निघू शकते.

दम्याचा त्रास कमी होतो – ज्यांना अस्थमा अथवा दम्याचा त्रास असेल त्यांनी सीताफळ खाल्ल्यास चांगला फायदा होऊ शकतो. सीताफळमधील व्हिटॅमिन बी ६ श्वसनमार्गातील सूज कमी करण्यास मदत करते. ज्यामुळे इनफेक्शनचा त्रास कमी होतो आणि दम्यापासून नक्कीच आराम मिळू शकतो.

सुंदर दिसण्यासाठी खा – सीताफळामुळे त्वचेचे आरोग्य चांगले राहू शकते. कारण सीताफळात व्हिटॅमिन ए आणि ॲंटिऑक्सिडंट भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे त्वचेच्या पेशींचे कार्य सुरळीत चालते आणि त्वचा चमकदार आणि फ्रेश दिसते. शिवाय नियमित सीताफळ खाण्यामुळे चेहऱ्यावरील एजिंगच्या खुणा कमी प्रमाणात दिसतात. चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होतात.

गर्भधारणेसाठी वरदान – गर्भधारणेत अपयश आल्यामुळे अनेक जोडप्यांचे आई-बाबा होण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. वास्तविक गर्भधारणेसाठी स्त्रीच्या शरीराला फॉलिक ॲसिडची गरज असते. जर फेलोपियन ट्यूबमध्ये दोष असतील तर ते फॉलिक ॲसिडमुळे कमी होतात. सीताफळात भरपूर प्रमाणात फॉलिक ॲसिड असते. ज्यामुळे गर्भधारणेच्या प्रक्रियेला नक्कीच चालना मिळू शकते. यासाठी आई होण्यासाठी प्रयत्न करत असाल तर सीताफळ खायला काहीच हरकत नाही. मात्र लक्षात ठेवा गर्भधारणेनंतर अती प्रमाणात सीताफळ खाल्ल्यास गर्भपाताचा त्रास होण्याची शक्यता असते.

स्वमग्नांचे मनोबल वाढवणे गरजेचे

अकरा वर्षांच्या मिहीरचे वागणे अगदी वेगळे असायचे. आपल्याच विश्वात तो रमायचा. सभोवतालाविषयी त्याला काहीही रुची नव्हती. केव्हाही काहीही पुटपुटणे आणि ओरडणे, उड्या मारणे सुरू असायचे. मिहीर दिसायला लोभस. अंगकाठी मजबूत. डोळे तीक्ष्ण. एकूणात, ॲक्टिव्ह; पण वागणूक विशेष मुलासारखी. दुसरीनंतर शिक्षण सुटले. त्याला विशेष शाळेत टाकले. तिथेही त्याच्या वागणुकीत बदल नाही. मिहीरला कुठे बाहेर नेणे म्हणजे वैताग आणि घरी ठेवले, तर गोंधळ. मूठमूठभर तिखट, मसालेपूड तो खात बसायचा. त्याचे हे त्रास पालकांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले. अखेरीस, मानसोपचारतज्ञांचा सल्ला घेतला गेला. जगात मिहीरसारखी दोन ते तीन टक्के मुले आहेत. या अवस्थेला 'स्वमग्नता' (ऑटिझम) म्हणतात. विकासपद्धतीत बिघाड झाल्याने अशा मुलांच्या मेंदूची विशेष रचना तयार होते. साधारण मुलांहून ती जास्त गतिमान असतात. आईच्या स्पर्शाचीही ओळख नसते, तेव्हा मेंदूचा विकास होताना त्यात किती तीव्र बिघाड झाले हे लक्षात येते. असे का होते, हे कोडे अद्याप उलगडलेले नाही. जन्माच्या वेळेस स्वमग्न मुलांच्या मेंदूचा आकार हा सामान्य मुलांच्या मेंदूपेक्षा जास्त असतो. अन्य काही त्रुटी नसतात. स्वमग्न मुले विशेष नसतात. त्यांच्यात काही विलक्षण प्रतिभा असतात. मिहीरचेच एक उदाहरण. एकदा तो पालकांसोबत संगीत मैफलीस गेला. अचानक स्वतःहून व्यासपीठावर गेला आणि तबला वाजवू लागला. अगदी एखाद्या निष्णात तबलावादकासारखा! साऱ्यांना आश्चर्य वाटले; पण ते तेवढ्यापुरते.

नंतर कधी त्याने तबल्याकडे पाहिलेही नाही. माज्याकडे येणाऱ्या अशा मुलांमध्ये अतिंद्रिय क्षमता दिसल्या. या मुलांचे स्पर्श अर्थपूर्ण असतात. त्यांनी इतरांच्या अंगभागांना स्पर्श केल्यास तिथे काही दुखणे वा आजार आहे, हे समजावे. मिहीरने एका स्त्रीच्या स्तनांना स्पर्श केला. तिने माज्याकडे तक्रार केली. मी तिला 'मॅमोग्राफी'ची तपासणी सांगितली. तपासणीत पहिल्या टप्प्यावरचा कर्करोग आढळला. काही मुले अतिविशिष्ट बौद्धिक क्षमतेची असतात. 'नासा'त कम्प्युटर कोड्सचे अर्थ लावण्याच्या कामी त्यांची मदत घेतली जाते. स्वमग्न मुलांचे वागणे औषधांनी बदलते का, ती हळूहळू स्वावलंबी होतात का, याविषयी पुढच्या भागात माहिती घेऊ.

विवाहित महिलांमध्ये रक्तप्रवाह नियंत्रित ठेवतात जोडवे, शृंगाराचे वैज्ञानिक महत्त्व

लग्नानंतर महिला सोळा शृंगार करतात. हिंदू धर्म परंपरांमागे विज्ञानही दडलेले आहे. महिलांनी शृंगार केलेल्या दागिन्यांचेसिद्ध वैज्ञानिक महत्त्व आहे. या सोळा शृंगारांमध्ये १५ वा क्रमांक हा पायाच्या बोटांमध्ये घातल्या जाणाऱ्या जोडव्यांचा येतो. सामान्यतः जोडवे हे चांदीचे असतात. जोडव्यांमध्ये पारंपरिक गुण असण्यासोबतच काही वैज्ञानिक फायदेही आहेत. ज्योतिष व्यतिरिक्त मॉडर्न सायन्सही जोडवे घातल्यामुळे होणाऱ्या फायद्याविषयी सांगते. महिलांच्या पायातील दुसऱ्या बोटातील तंत्रिकेचा थेट संबंध गर्भाशयाशी असतो, जी हृदयापासून जाते आणि याच कारणामुळे उजव्या तसेच डाव्या पायाच्या दुसऱ्या बोटात जोडवे घालण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे गर्भाशय स्वस्थ आणि ब्लडप्रेशर नॉर्मल राहते. शरीरामध्ये ऊर्जा प्रवाह वाढवण्यासाठी पायात चांदीचे जोडवे घालणे उत्तम राहते. चांदी शरीरासाठी थंड मानली जाते. चांदीचे जोडवे घालून जमिनीवर चालल्यास शरीराला सकारात्मक ऊर्जा मिळते. जोडवे धारण केल्यास मेंदू शांत राहतो आणि तणावही कमी होतो. सायटीक नर्व्हच्या एका नसेवर जोडव्यांचा दबाव पडतो आणि यामुळे जवळपासच्या इतर नसांमधील रक्तप्रवाह वाढतो आणि यूट्रस, ब्लॅडर आणि आतड्यांपर्यंत रक्तप्रवाह व्यवस्थित होतो. गर्भाशयापर्यंत योग्यप्रकारे रक्त पोहोचते. शरीरात रक्तप्रवाह व्यवस्थित असल्यास आरोग्य चांगले राहते.

रेसिपी

'नारळी भाते'



साहीत्यः

- ३/४ कप तांदूळ
- दिड कप पाणी
- २ + १ टेस्पून साजूक तूप
- २ ते ३ लवंगा
- १/४ टिस्पून वेलची पूड
- १ कप गूळ, किसलेला
- १ कप ताजा खोवलेला नारळ
- ८ ते १० काजू
- ८ ते १० बेदाणे

कृती :

- तांदूळ धुवून चाळणीत अर्धा ते पाऊण तास निथळत ठेवावेत. पातेल्यात २ टेस्पून तूप गरम करावे. लवंग घालून काही सेकंद परतावे. निथळलेले तांदूळ घालून २-३ मिनीटे मध्यम आचेवर परतावे.
- तांदूळ परतत असतानाच दुर्सया गॅसवर दिड कप पाणी गरम करावे. गरम पाणी परतलेल्या तांदूळात घालावे. पातेल्यावर झाकण ठेवून मध्यम आचेवर भात शिजवावा. भात शिजला कि हलक्या हाताने एका थाळीत काढून मोकळा करावा. शिते मोडणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.
- नारळ आणि गूळ एकत्र मिक्स करावे. भात गार झाला कि हे मिश्रण भातात अगदी हलक्या हाताने मिक्स करावे.
- जाड बुडाचे पातेले गरम करावे. त्यात तूप गरम करून काजू आणि बेदाणे गुलाबी रंगावर तळून घ्यावे.
- झाऱ्याने काजू आणि बेदाणे दुसऱ्या वाटीत काढावे. गॅस मंद करून उरलेल्या तूपात भात-नारळ-गूळ यांचे मिश्रण घालावे. वेलचीपूड घालावी. घट्ट झाकण ठेवून ३-४ वाफा काढाव्यात. मधून मधून हलकेच भात वरखाली करावा. साधारण १० ते १५ मिनीटे शिजवावे.
- भात सुरूवातीला थोडा पातळ होईल आणि काही मिनीटांनी आळेल. शेवटची २-३ मिनीटे झाकण न ठेवता भात शिजवा. तळलेले काजू, बेदाणे घालावे. सर्व्ह करताना तूप घालून सर्व्ह करावे.

बोधकथा

उंची खिचडी

दिल्लीची जबरदस्त थंडी चराचराला गोठवुन टाकत होती. अशा त्या भयंकर थंडीच्या मोसमात अकबरानं बिरबलाला विचारलं, 'बिरबल, या थंडीच्या दिवसात एखादा एखादा माणूस शंभर मोहोरांसाठी त्या समोरच्या तलावात स्वतःला गळ्यापर्यंत बुडवून घेऊन, रात्र काढील काय रे?' 'कुणी सांगाव? परिस्थितीनं गांजलेला पण प्रकृत्तीनं ठणठणीत असलेला एखादा माणूस हे दिव्य करायला तयार होईलसुध्दा.' बिरबल बोलून गेला. दुसऱ्याच दिवशी बिरबलाला असा मनुष्य आढळला. तो त्याला बादशहाकडे घेऊन गेला. बादशहा त्याला म्हणाला, 'कुठल्याही तऱ्हेची ऊब न घेता, उघड्या अंगान सबंध रात्र त्या तलावात, गळ्यापर्यंत बुडलेल्या स्थितीत काढायची, ही अट तुला मान्य आहे ना?' त्या गरजू माणसान ती अट मान्य केली आणि बादशहाने ठेवलेल्या शिपायांच्या जागत्या पहाऱ्यात, त्या तलावातील बर्फागार पाण्यात त्याने ती सबंध रात्र घालवली. मग शंभर सुवर्ण मोहोरांचे इनाम घेण्याच्या आशेने तो माणूस राजवाड्यावर गेला असता, बादशहानं त्याला विचारलं 'काय रे? थंडी एवढी जबरदस्त पडली असताना, तू तलावाच्या गार गार पाण्यात सबंध रात्र कशी काय काढलीस?' तो मनुष्य म्हणाला, 'आपल्या वाड्याच्या सर्वात वरच्या मजल्यावरचा दिवा मला दिसत होता. त्याच्यावर दृष्टी खिळवून, मी गेली रात्र कशीतरी घालवली' त्याच हे विधान ऐकून बादशहाचा हुजऱ्या म्हणाला, 'खाविंद, आपला वाडा त्या तलावापासून अर्धा मैल असला, तरी त्याच्या वरच्या मजल्यावर जळत असलेल्या दिव्याकडे हा टक लावून बघत राहिल्याने, त्याची ऊब याला थोड्याफार प्रमाणात का होईना-मिळाली.' म्हणजे याने 'कुठल्याही तऱ्हेची ऊब न घेता तलावाच्या पाण्यात रात्र काढण्याची अट मोडलेली आहे. तेव्हा याला कसल्या शंभर सुवर्ण मोहोरा द्यायच्या?' हुजऱ्याच्या या म्हणण्याला बादशहांनी दुजोरा दिला आणि तो गरीब मनुष्य हिरमुसल्या मनानं परत गेला. मात्र त्याच दिवशी त्याने बिरबलाची भेट घेतली आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाची त्याला माहिती दिली. बिरबलाने त्याला थोडा धीर धरायला सांगून, घरी जायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी बराच उशीर झाला, तरी बिरबल दरबारात आला नसल्याचे पाहून, बादशहानं दरबारी मंडळीकडे त्याची चौकशी केली; तेव्हा एकजण हसत हसत म्हणाला, 'खाविंद, आपल्या लाडक्या बिरबलाचं डोकं फिरलयं! यमुनेकाठी २० हात उंचीचे तीन खांब अगदी एकमेकांजवळ पूरुन त्यावर त्याने खिचडीसाठी धान्याची एक हंडी ठेवलीय, आणि खाली जमीनीवर त्याने गवताची एक बारीकशी शेकोटी पेटवलीय!' हा अजब प्रकार ऐकून आश्चर्यचकीत झालेला बादशहा स्वतः बिरबलाकडे गेला व त्याला म्हणाला, 'बिरबल, अरे, एरवी तू एवढी चतूर असताना, आज तुझ्या डोक्यात हे वेडकसं काय शिरलं? अरे, जमिनीवर पेटवलेल्या या गवताच्या छोट्या शेकोटीची धग त्या वीस हात उंचीवर ठेवलेल्या खिचडीच्या भांड्याला लागणं शक्य आहे का?' बिरबल म्हणाला, 'का नाही लागणार? आपल्या वाड्याच्या वरच्या मजल्यावरील दिव्याच्या ज्योतीची धग जर अर्ध्या मैलावर असलेल्या त्या तलावातील माणसाला लागते, तर या शेकोटीची धग अवघ्या वीस हात उंचीवर ठेवलेल्या माझ्या खिचडीच्या हंडीला का लागू नये?' बिरबलाच्या या उत्तरानं बादशहाच्या डोक्यात 'प्रकाश' पडला, आणि त्याने त्या तलावात रात्र काढलेल्या माणसाला बोलवून, त्याला शंभरऐवजी दोनशे सुवर्ण मोहरा दिल्या.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ०१, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, गजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-९५९४४१८१८१ / ८४२४९८९८९८